ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 3.8014 (UIF)

REVIEW OF RESEARCH

VOLUME - 6 | ISSUE - 9 | JUNE - 2017

# काळाच्या प्रवाहात आणि बदलत्या सांस्कृतिक प्रवाहात लोककला तमाशात झालेला बदल

प्रा. डॉ. हिरालाल लोखंडे

## प्रस्तावना :




'तमाशा' हा मूळ शब्द पर्शियन भाषेतून उर्दूत आला; आणि उर्दूतून तो मराठी भाषेत आलात्र मूळ पर्शियन आणि उर्दू या दोन्ही भाषांमध्ये 'तमाशा' या शब्दाचा अर्थ मौजेचं, आनंदाचं किंवा आश्चर्यकारक दृश्य असा होतो. आरंभीच्या काळात मराठीत देखील तमाशाचा अर्थ आनंद देणारं वा मौजमजेचं साधन असा होता.

शेकडो वर्षापासून मराठी मनाला भुरळ घालणाऱ्या तमाशाची सुरूवात मोठ्या गमतीशीर रीतीनं झाली आहे. सन १५२६ साली बाबर दिल्लीचा बादशाह बनला. बाबरानंतर त्याचा वंशज अकबर यानं चहुमुलखी साम्राज्य वाढवलं. या वाढलेल्या साम्राज्याचा शाहजहान आणि पुढं औरंगजेब यांनी मोठ्या ऐषाआराम उपभोग घेतला. बादशहांच्या चैनी आणि रंगेल वृत्तीमुळे आणि सतत रिकाम्या असल्यानं त्यांच्या फौजाही रंगेल अन् चैनी बनल्या. सन १५२६ पासून औरंगजेबाच्या मृत्युपर्यंत म्हणजे सन १७०७ पर्यंत उणीपुरी पावणे तीनशे वर्षे बाबरांच्या वंशानं भारत देशावर राज्य केलं.

याच दरम्यान महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या लोक कल्याणकारी राज्याचा उदय झाला. सन १६५९ साली छत्रपती शिवाजी महाराजांचा बिमोड करण्यासाठी आलेल्या अफझलखानाचा वध महाराजांनी केल्यावर औरंगजेबाने पुन्हा शिवाजी महाराजांचा बिमोड करण्याचं ठरविलं. सन १६७४ साली महाराजांचा राज्याभिषेक झाला. औरंगजेबाचं कटकारस्थान चालूच होतं. सन १६८० साली महाराजांचा काळ झाला. आणि औरंगजेबानं राजे संभाजी महाराजांचा वध करुन महाराष्ट्राच्या अस्मितेला जबरदस्त चपराक दिली.

या काळात महाराष्ट्रात औरंगजेबाच्या फौजांचे हजारो तळ पडलेले होते. सुखासीन बनलेल्या या रंगेल अन् चैनी फौजांना वैषयिक अतृप्तीत दीर्घकाळ काढावा लागत असे. त्यामुळे श्रृंगार आणि विषयवासना यांना उतारा मिळेल अशा स्वरुपाच्या करमणुकीची गरज त्यांना अधिक भासत होती. त्यावेळी महाराष्ट्रात गोंधळी, जोशी, भराडी, बहुरुपे, जोगी, वासुदेव, कोल्हाटी, कंजारी, बाळसंतोसी, भुते, गारुडी अशी लोककलावंत मंडळी लोकरंजनाच काम करीत होती. परंतु त्यांच्या रंजनाने फौजी लोक सुखावत नसत. त्याचवेळी उत्तरेकडे नायकिणी नाचवल्या जात असतं. इकडच्या लोककलावंतांच्या ताफयांना फौजी सैनिकांनी नाचणाऱ्या बायकांची मागणी केली आणि आरंभी स्त्री वेशातला नाच्या लोककलावंतांच्या मेळ्यात आला. त्यातच धार्मिक संचिताचं चिंतन लाभलेल्या इथल्या लोककलावंतांची पदं, गीतं, गवळणी हे मुस्लिम सैन्याला थोडंच चालणारं होतं? त्यांना हवं होतं उन्माद आणणारं मदमस्त श्रृंगारिक नाचगाणं,

यातूनच जुळवाजुळव झाली. कोल्हट्याची ढोलकी, डौऱ्याचं तुणतुणं, भजनातल्या झांजा, लोखंडाची कडी असा वाद्यमेळ लोककलावंतांकडून आला. तमाशातलं झाणक्यातणक्यातलं संवादरुप भारुडातून आलं. वाघ्या मुरळीची हाळी घालून सूर देण्याची पध्दत घाटणीत उतरली.

मुळातच मराठी स्वभावधर्म कडक आणि त्यातून उघड्या तळावर असे कार्यक्रम करावे लागत. त्यामुळे तमाशाच्या आवाजात खणखणीतपणा आला. तमाशात स्त्रीनर्तिका आली. ती राधा गवळणीच्या रूपानं बतावणीत. अशा रीतीनं उभ्या राहिलेल्या फडाला मुस्लिम फौजांनी नांव दिलं 'तमाशा' आणि मग हा तमाशा मुस्लिम फौजांची शृंगारिक भूक भागवित रंजन करु लागला.

सन १७०७ साली औरंगजेबाचा मृत्यू झाला; आणि सन १७०८ साली शाहू महाराजांनी साताऱ्याला राजधानी स्थापन करुन पुण्याची पेशवाई बाळाजी विश्वनाथांना दिली. राजा साताऱ्यात आणि प्रधान पुण्यात अशी स्थिती असली तरी पुढं या पेशवे घराण्यानं सन १७५८ साली अटकेपार झेंडा फडकविला. सन १७०८ते १७५८ या काळात मोगलांचा पुरता पाडावा झाला; आणि सर्वत्र मराठा सैन्याच्या छावण्या पडल्या.

पूर्वी मोगलांच्या फौजी छावण्यांमधून खेळ करणारे खेळीये आणि तमासगीर आता मराठा सैन्याचं रंजन करु लागले. पेशवाईच्या काळात पुढं सुखासीन बनलेल्या पेशव्यांनी या कलेची मोठ्या प्रमाणात बिदाग्या देऊन कदर केल्याच्या नोंदी उपलब्ध आहेत.

सन १७४४ साली अनंत फंदी या शाहिराचा जन्म झाला. पुढं 'कटावकार' म्हणून प्रसिध्द पावलेल्या या शाहिरानं तरुणपणी लावणी तमाशाचा फड काढला. सन १७५४ आणि १७५८ या साली अनुक्रमे प्रभाकर आणि राम जोशी हे शाहिर जन्मले. राम जोशी यांनी सोलापूरचा लावणीचा फड पुण्यात गाजवला. पुण्याच्या गंगू हैबतीच्या फडातला प्रभाकर हा कवणकार याच काळातला. होनाजी आणि त्याचा चुलता बाळा यांनी संयुक्तपणे लावण्या लिहून फड गाजवले. या होनाजी बाळावर दुसऱ्या बाजीरावाचं फार प्रेम होतं. त्यांना अनेक बक्षीसं दिल्याची नोंद पेशवे दप्तरी दिसून येते. बाजीरावांच्या तमाशा वेडाबद्दल मराठी रियासतकार गो. स. सरदेसाई यांनी 'युध्दाच्या वणव्यातील बाजीरावांचे ढंग' या पुस्तकात लिहिलं आहे.

पेशवेकालीन तमाशाला ढोलकीचा तमाशा म्हटले जाते. या तमाशात गण, गौक्ण, पदे आणि लावण्या म्हटल्या जात. नृत्याचे काम नाच्या करी. त्यामुळे नृत्य, संगीत आणि गीत असे स्वरुप या तमाशाचे होते. त्याकाळी तमाशाचे फड असत. फडात तमाशाचा मुख्य सरदार, ढोलक्या, कडे वाजविणारा, दोन—तीन सुरत्या, गोड आवाजाचा गोरा.गोमटा देखणा नाच्या पोर आणि सोंगाड्या अशा व्यक्ती असत.

तमाशाचा फड काढणारा हा बहुदा शाहीर असून तोच या फडाचा सरदार असे. तो स्वत: कवने तयार करुन इतर साथीदारांच्या मदतीने तमाशाचा फड उभा करीत असे. या काळातील तमाशाचा भर प्रामुख्याने नृत्य—गायनावरच असे. सरदार आपल्या हाती डफ घेई, सुरत्ये तुणतुणे व झांज वाजवीत, नाच्या पोर नृत्य करीत असे. सरदार रंगबाज व ढंगबाज गीत गात असे आणि सोंगाड्या साभिनय विनोद करुन लोकांना हसविण्याचे काम करी.

पेशवाईत प्रामुख्याने शिमग्याच्या सणानिमित्त तमाशाचे फड उभारले जात. कधी कधी राजदरबारातही पेशव्यांच्या मनोरंजनासाठी तमाशाचा फड आयोजित केला जात असे. पुढे पुढे गावोगावी तमाशाचे फड होत. मग हे तमाशाचे फड गावातील चावडीवर, सार्वजनिक ठिकाणच्या उंचवटयावर, तर कधी माळरानावरही तमाशा रंगू लागला. तमाशाची सर्व मदार सरदार, नाच्या आणि सोंगाडया यावर असे.

तमाशातून जी गाणी गायली जात ती शृंगार रसपूर्ण असत. अर्थात आध्यात्मिक स्वरुपाच्या रचनाही तमाशातून नाच्याच्या नाचावर गायिल्या जात. या रचना शहिरांनी रचलेल्या असत. 'लावणी' हा गीतप्रकार पेशवाईत बहरास आला. लावणीमुळे तमाशाला खरी रंगत आली.

या काळातील तमाशाचे स्वरुप स्थूलमानाने पुढीलप्रमाणे होते.

- गण—तमाशाची सुरुवात गणाने म्हणजे देवता स्तवनाने होत असे. आपल्या आराध्य दैवताची स्तवनपर गीते सरदार तमाशात या प्रसंगी गात असे.

- गौळण—गणानंतर गौळणीचा रंगतदार कार्यक्रम सादर केला जाई. श्रीकृष्ण आणि राधा, गोकुळातील गौळणी, त्यांचे इतर सवंगडी यांच्या रुपांतून साभिनय 'गौळणी' गायिल्या जात. नाटयात रंगत आणली जाई ती याच कार्यक्रमात. सोंगाडया शारीरिक हावभाव आणि संवादातून विनोदनिर्मिती करुन लोकांना हसविण्याचे काम करी. नृत्य, गीत, संवाद अभिनय या स्वरुपातून नाटय विकसित केले जाई ते गौळणीतच. शाहिरांनी रचलेल्या गौळणी या प्रसंगी सादर केल्या जात.
- लावण्या—तमाशाचा मुख्य भाग म्हणजे लावणीचा. नृत्य गायनाला बहार येई ती याच भागात. शृंगाररसपूर्ण लावण्या गाऊन प्रेक्षकांची मने जिंकण्याचीतमाशातील किमया लावणीत असते.
  पेशवाईत होऊन गेलेल्या अनेक प्रसिध्द शाहिरांनी लावण्या रचून मराठी वाङमयात संपन्नता आणली. लोकनाटयाचे महत्त्वाचे आकर्षण म्हणजे त्यातील लावण्या होय. धार्मिक, आध्यात्मिक आणि सामाजिक आशय असलेल्या लावण्याही तमाशात म्हटल्या जात.
  पेशवाईतील तमाशाचे साधारणत: स्वरुप वरीलप्रमाणे होते. गण—गौळण—लावणी या शिवाय भेदिक कवनेही तमाशातून सादर केली जात. मराठी लोकजीवनाचे आणि लोकमनाचे प्रतिबिंब तमाशात पडत असल्यामुळे मराठी लोकजीवनात तमाशाला मनोरंजनाच्या दृष्टीने आगळे—वेगळे महत्त्व लाभले. तमाशातील लावणी मऱ्हाट—मोळया तरुणांच्या ओठावर तरळू लागली. तमाशाच्या या उर्जितावस्थेला ा काळातील शाहिरांनी फार मोठा हातभार लावला. त्यांच्याच योगदानाने तमाशा उमलला, खुलला आणि बहरला असे म्हणता येईल.

## आधुनिक तमाशा

पेशवाईनंतर तमाशात लक्षणीय बदल झाला. त्यात नाच्या पोऱ्याऐवजी स्त्री नर्तिकेचा प्रवेश झाला आणि तमाशात अधिक रंगत आली. तमाशात स्त्री नर्तिकेचा प्रवेश आणि वग यामुळे तमाशाला अधिक लोकप्रियता लाभली. गोंधळ—जागरणातील उत्तर रंगात कथा सादर केली जात असे. त्या धर्तीवरच आता तमाशात 'वग' सादर केले जाऊ लागले. तमाशातील वग म्हणजे मौखिक स्वरुपातील या लोकनाटयाची संहिताच होय. पण वगात संवादाला विशेष महत्त्व होते. संवादातूनच कथावस्तू विकसित केली जाई. खटकेबाज, खुमासदार आणि खुसखुशीत संवाद यामुळे त्यातील नाटय अधिक खुलू लागले. तमाशात वगाचा स्वीकार जेव्हा केला गेला तेव्हा वगाचे विषय पौराणिक स्वरुपाचेच होते. सीता—सावित्री, नळ—दमयंती, हरिश्चंद्र—तारामती या सारख्या पौराणिक कथाभागावर आधारित वग सादर केले जात. पुढे लोकांच्या अभिरुचीला तमाशात महत्त्व दिल्यामुळे सामाजिक आशयाचे वग सादर केले जाऊ लागले व तमाशातील नाटयसंहितेला लिखित रुप येऊ लागले.

तेव्हा स्थूलमानाने पेशवाईनंतर तमाशात स्त्री नर्तिकेचा प्रवेश आणि वगाचा स्वीकार हे दोन महत्त्वाचे बदल स्विकारले गेले. त्यातून आज प्रचलित असलेल्या तमाशाला आधुनिक स्वरुप आले. आजच्या तमाशाचे स्वरुप पुढीलप्रमाणे सांगता येते.

१. गण २. गौळण ३. वग ४. लावणी

तमाशाची सुरुवात गणाने केली जाते. गणात गणपतीची स्तवनपर गीते गायिली जातात. गणानंतर गौळणीचा रंगतदार कार्यक्रम सादर केला जातो. श्रीकृष्ण—राधा आणि गौळणी व श्रीकृष्णाचे सवंगडी यांच्यातील खुसखुशीत संवाद आणि 'गौळणी' या गीत प्रकाराचा नयनमनोहर मिलाप यात पाहावयास मिळतो. गौळणीत मावशीबाई आणि सोंगाडया या दोन पात्रांचा अधिकच समावेश असतो. मावशीबाई राधा आणि गौळणी यांच्या पक्षाचे नेतृत्व करते तर सोंगाडया श्रीकृष्णाच्या बाजूने उभा राहतो. मावशीबाई आणि सोंगाडया या पात्रांच्या योजनेमुळे 'गौळणीत' संवादनाटय खुलून विनोदनिर्मिती होते. मधून मधून नृत्य आणि गीते संवादाला जोडून सादर केली जातात.

काही तमाशात गण—गौळणीनंतर लावणी नृत्याचा कार्यक्रम सादर केला जातो, तर काही तमाशातून वगातील कथानक, लावणी आणि नृत्य यांचा मेळ घातलेला असतो. गण—गौळणीनंतर संवाद—नाटयही

सादर केले जाते. या संवादाला रंगबाजी असेही म्हणतात. संवादातून छोटीशी कथा साभिनय विकसित करण्याचा प्रयत्न असतो. या संवाद—नाटयाचे स्वरुप विनोदी असते.

गेल्या पंधरा—वीस वर्षात भारतातील तसेच महाराष्ट्रातील लोककथा टिकाव्यात यासाठी साहित्यक्षेत्रात तसेच महाविद्यालयीन, विद्यापिठीय व शासनाच्या सांस्कृतिक विभागातर्फे युध्दपातळीवर विविध प्रयत्न होत आहेत.

**उदाहरणार्थ :—**

नारायणगाव (पुणे) व नवी मुंबई (वाशी) या ठिकाणी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विभागाद्वारे झालेले तमाशा महोत्सवाचे आयोजन

मुंबई विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद तसेच शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर इत्यादी ठिकाणी स्थापन झालेल्या 'लोककला अकादमी' या संस्थामधून होणारा लोककलांचा सर्वांगीण अभ्यास.

ई.टिव्ही मराठी, मी मराठी, सह्याद्री वाहिनी इत्यादि, वाहिन्यांद्वारे प्रसारित झालेल्या अकलूज लावणी स्पर्धा, छूम छूम छन...न....न सारख्या लावणी स्पर्धांचे होत असलेले आयोजन.

संगीत बारीत होत असलेला मुजरा, बैठक, लोकनृत्य, लावणी, तमाशा, नटरंगी नार यांसारखे कार्यक्रम जोरदारपणे चालू असून एकूणच सांस्कृतिक पातळीवर लोककला टिकविण्याची मोठी धडपड होताना दिसते आहे.

असे प्रयत्न कां व्हावेत? याचे उत्तर शोधले असता; असे लक्षात येते की काळाच्या ओघात जुने नष्ट होत जाते व नवे रुजू लागते. जुने ते सोने या न्यायाने समाज जुने टिकावे म्हणून जोरदार प्रयत्न करत असतो. कारण या सर्व लोकपरंपरा व लोककला आपल्या संस्कृतीचा व अस्मितेचा अमूल्य ठेवा असतो. प्रत्येक समाजाच्या संस्कृतीची ती ओळख असते. शिवाय या लोककला माणसाचे धर्म, रुढी, परंपरा यांच्यातील भूतकालीन नाते अधोरेखित करीत असतात. एवढेच नव्हे तर, या लोककलांचा थेट संबंध मानव व निसर्ग यांच्या अतूट नात्याशी असतो. तसेच माणसाच्या कुटुंबव्यवस्थेतील तरल व संवेदनशील नातेही त्या कला सांगत असतात. आणि त्यातूनच समाजाची देशीय जाणीव व्यक्त होत असते. म्हणून हे सर्व प्रयत्न होताना पाहून लोककला प्रकारांची पार्श्वभमी पाहावी लागते.

सवाई माधवराव, दुसरा बाजीराव पेशव्यांच्या काळात तमाशाची भरभराट झाली. एक लोकनाटय म्हणून तमाशा या काळात नावारुपास आला. इंग्रजांच्या काळातही तमाशा लोकप्रियतेच्या शिखरावर होता. एकूणच तमाशा करण्याच्या मागे केवळ करमणूक किंवा मनोरंजनाचा उद्देश होता. त्यातील विनोद हा अतिशय पांचट, उथळ व लैंगिक पातळीवर आधारलेला असे. याचे कारण म्हणजे बहुजनसमाजातल्या रांगडी लोकांना त्यांच्याच रांगडी भाषेत कळेल असे त्याचे स्वरुप होते. म्हणून प्रा. म. अ. जोशी म्हणतात, ''तमाशा बहुजनांच्या मनात चांगला रुजला. ग्रामीणतेचा बाज, भाषेतील सहजता, त्यातील नृत्य, संगीतामुळे ते बहुजन समाजाचे प्रातिनिधीक नाटय ठरले होते.'' 'निखळ मनोरंजन' हे ह्या काळातील तमाशाचे प्रमुख स्वरुप झाले होते. कलात्मदृष्टीने ह्या लोकनाटयाकडे कितपत पाहिले जात असेल हा संशोधनाचा विषय आहे. कष्टकरी, सरदार, दरकदार इत्यादी लोकांच्या करमणूकीचे साधन म्हणून 'तमाशा'कडे पाहिले जात होते.

काळ बदलला म्हणजे कलाही बदलते, ''परिवर्तन संसार का नियम है'' ह्या न्यायाप्रमाणे 'तमाशा' ही अंतर्बाह्य बदलला. हा बदल १९व्या शतकातील प्रबोधनयुगाच्या पथ्यावर पडला. 'किसन फागुजी बनसोडे' सारख्या शाहीरांनी प्रबोधनविचार 'जलशा' द्वारे मांडण्यास सुरुवात केली. 'तमाशा' मधील गण—गवळण, बतावणी, वगनाटय इत्यादी नाटयात संवादरुपी वैशिष्टयांचा वापर करुन त्यांनी समाजप्रबोधनपर विचार लोकांपर्यंत पोहचवला. तसेच महात्मा फुलेंच्या प्रबोधनपर विचारांसाठीच 'सत्यशोधक जलसे' 'ओबेडकरी जलसे' हा वारसा शाहीर अण्णाभाऊ साठे यांनी साम्यवादी विचाराद्वारे जपला. म्हणजेच केवळ निखळ मनोरंजन करणारे 'तमाशा' हे लोकनाटय स्वातंत्र्यपूर्व व उत्तर काळात काळात प्रबोधनपर विचार प्रसारित करणारे एक मुक्तनाटय ठरले.

२१व्या शतकात जागतिकीकरणाच्या रेटयात आज ह्या लोककलांची काय अवस्था आहे? एखाद्या वस्तूसंग्रहातील दुर्मिळ वस्तूंसारखी अवस्था ह्या लोककलांना आज प्राप्त झाली आहे. एक Tradition म्हणून त्याच्याकडे आजचा समाज बघतो. याला कारण ही कला एकेकाळी ज्या समाजाने आपली उपजीविका मानली होती. तिच या काळात त्यांचे आर्थिक, सामाजिक व राजकिय बाजूंनी शोषण करणारी ठरली. त्याकाळी तमाशात वाजवायला मातंग, गायला महार, नाचायला कोल्हाटी स्त्रिया, तर तंबू व बांबू रोवायला आदिवासी मजूर असत. आज या वगार्रतील लोकांनी शिक्षित होऊन तमाशाकडे पाठ फिरवली. त्यामुळे या लोककला आज लोप पावत आहेत.

## लोककलेचा व्यावसायिक प्रवास :—

मनवाचा सांस्कृतिक व सामाजिक इतिहास जतन करण्याचे काम लोककला करत असतात. या लोककलांकडे अधिक कलात्मक दृष्टिने बघण्याची वेळ आली आहे. हा अभिजात ठेवा जपून ठेवण्याचा प्रयत्न आपण केला नाही तर त्याला व्यावसायिक रुप येऊन त्यातील खरे सौंदर्य दुर्दैवाने नाहीसे होईल. तमाशाची व्यवस्था, त्याचे अर्थकारण, तमाशाचा भौगोलिक विचार, तमाशा कलावंतांचे जीवन, त्यांच्या आरोग्याचा प्रश्न इत्यादी गोष्टींचा विचार करता 'तमाशा' सारखी लोककला आधुनिक काळात टिकून राहिल का ?

या प्रश्नाचे उत्तर तपासताना काही विषम गोष्टी प्रकर्षाने निदर्शनास येतात. तमाशाचे आर्थिक सूत्र मराठा मालक अथवा सावकाराकडे असते. तर नाचायला मात्र महार—मांगाची स्त्री विठाबाई, कांताबाई, सुरेखा पुणेकर यासारख्या स्त्रिया असतात. तमाशाचा फड या बायकांच्या नावे असतो आणि आर्थिक मलिदा मात्र मारुती सावंत, तुकाराम खेडकर, बाबा पठाणाकडे जातो. या आर्थिक विषमतेमुळे मागास समाजातील माणसे कायमस्वरुपी मागासलेली राहतात.

तमाशा आणि राजकारणी लोकांचे नाते तर घनिष्ठ स्वरुपाचे आहे. संगीत बारीच्या किंवा तमाशाच्या फडात चोर पावलांनी जाणारे बहुतेक मराठा पुढारी असतो किंवा इतर समाजातील राजकारणी असतो. हेच पुढे त्या तमाशाचे बाजारीकरण करतात. त्यामुळे तमाशात अनैतिक कृत्यांचा सुळसुळाट झाला आहे. खरा तमाशा आता दिसत नसून त्याचे ऑर्केस्ट्रात रुपांतर झाले आहे. 'डोक्यावरचा पदर जेव्हा खांद्यावर आला तेंव्हाच तमाशाचा ऑर्केस्ट्रा झाला' हे विठाबाई मांग यांचे मार्मिक उद्गार आजच्या तमाशाची भीषण परिस्थितीच कथन करतात.

अलिकडे तमाशाला 'मुजरा संस्कृती' ची लागण झाली आहे. महार मांगाच्या स्त्रियांबरोबरच आता उच्चवर्ण वर्गातील मुली नाचू लागल्या आहेत. लावणी शो सारख्या कार्यक्रमांमधून या संस्कृतीला चांगली प्रतिष्ठा मिळत आहे. मात्र या पाठीमागे केवळ आर्थिक तडजोड असल्यामुळे आता लोकसंस्कृतीचे विकृतीकरण होऊ लागले आहे.

एकूणच काळाच्या प्रवाहात आणि बदलत्या सांस्कृतिक प्रवाहात तमाशात झालेला हा बदल अपरिहार्य वाटत असला तरी तो विपरित मार्गाकडे न वळता त्याला मनोरंजनातून प्रबोधन करणारा एक पुरोगामी चेहरा देऊन सामाजिक परिवर्तनासाठी त्याचा वापर व्हावा, हीच या चर्चसत्राच्या निमित्ताने लोककला अभ्यासक, संशोधक व तमाशाचे भले करु इच्छिणाऱ्या व्यक्तिकडून अपेक्षा आहे. धन्यवाद !

## संदर्भ :—

१. लोकसाहित्य शब्द आणि प्रयोग — डॉ. साहेब खंदारे, पृ. क. ३१
२. तत्रैव, पृ. क. ३२
३. तत्रैव, पृ. क. ३३
४. लोकनाटय उद्गम आणि विकास, डॉ. पु. णा. कालभुत, पृ. क. १
५. बहुरुपी महाराष्ट्र, रामचंद्र देखणे, पृ. क. ५
६. लोकवाङमय रुप—स्वरुप, डॉ. शरद व्यवहारे, पृ. क. १८३
७. तत्रैव, पृ. क. १८४
८. तत्रैव, पृ. क. १८५

९.लोकसाहित्य रंग आणि रेखा, डॉ. शरद व्यवहारे, पृ. क्र. १५
१०. तत्रैव, पृ. क्र. १६